# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 20/02/2024 (मंगळवार) दुपार

---

**अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद**

**वाहनासह एकुण ४०,५०,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त**

**नागपूर ग्रामीण विशेष पथकाची कारवाई**

मा. पोलीस अधिक्षक सा. ना. ग्रा. यांच्या आदेशान्वये दिनांक १९/०२/२०२४ रोजी मा. पोलीस अधिक्षक सा. यांचे विशेष पोलीस पथक नागपूर ग्रामीण हे पोलीस स्टेशन कुही येथील स्टाफ यांचे सह पोस्टे कुही परीसरात अवैध्य व्यवसायावर कार्यवाही करणे कामी पेट्रोलींग करीत असता गोपनीय बातमीदारांमार्फत माहिती मिळाली की, अंभोरा नविन पुलावरून वेलतुर मार्गे कुही कडे एक पांढऱ्या निळया रंगाचा टिप्पर अवैध्यरित्या रेती भरून वाहतुक करीत आहे. अश्या मिळालेल्या माहितीवरून स्टाफसह मौजा मांढळ रोडवरील वडेगाव फाटा समोरील रोडवर दि. २०/०२/२०२४ रोजी सकाळी ०६.३० वा. दरम्यान एक टिप्पर रेती भरून येतांना दिसल्याने त्यास थांबवले असता सदर टिप्पर क्र. एम.एच—३६/एवी— ७८३३ मध्ये रेती भरलेला १२ चक्का टिप्पर चालकास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने आपले नाव **नवनाथ राजकुमार कांबळे वय २८ वर्ष, रा. गुडेगाव ता. पवनी जि. भंडारा ह. मु. काडगाव ता. उमरेड जि. नागपूर** असे सांगीतल्याने त्यास टिप्पर ट्रकमध्ये असलेल्या रेतीच्या रॉयल्टीबाबत विचारपुस केली असता त्याने रॉयल्टी नसल्याचे सांगीतले तसेच नमुद टिप्परमध्ये अंदाजे १० ब्रास रेती किंमती ५०,०००/—रू. असल्याचे सांगीतले. यातील नमुद आरोपीतांनी टिप्परमध्ये अवैध्यरित्या बिना परवाना अंदाजे १० ब्रास रेती किंमती ५०,०००/— रू. रेतीची वाहतुक करतांना मिळुन आल्याने आरोपीतांच्या ताब्यातून अंदाजे १० ब्रास अवैध्यरित्या रेती किंमती ५०,०००/—रू. व रेती भरलेला टिप्पर क्र. एम. एच—३६/ए. वी— ७८३३ किंमती ४०,००,०००/—रू. असा एकूण ४०,५०,०००/—रू. चा मुद्देमाल मिळुन आल्याने टिप्पर चालक नवनाथ राजकुमार कांबळे यास विश्वासात घेवुन अधिक विचारपुस केली असता सदर टिप्पर **मालक धनपाल अंबादास गभने रा. गुडेगाव जि. भंडारा** हा असुन त्याचे सांगणेवरून नमुद रेती वाहतुक करीत असल्याचे सांगीतले त्यावरून टिप्पर चालक व टिप्पर मालक नामे धनपाल अंबादास गभने रा. गुडेगाव जि. भंडारा यांचे विरूध्द कलम ३७९, ३४, १०९ भादंवि सह. कलम ४८(७), ४८(८), महाराष्ट्र जमीन महसुल अधिनीयम—१९६६, सहकलम ४, २१ खाणी आणि खनिजे (विकास आणि नियमन) अधिनियम १९५७ अन्वये गुन्हा करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक देविदास ठमके, पोलीस हवालदार हरीदास चाचरकर, पोलीस अंमलदार गोरख निंबार्ते, अतुल बांते विशेष पथक नागपूर ग्रामीण यांनी केली.

# अवैधरीत्या घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक

पो.स्टे. बोरी :– दिनांक १९/०२/२०२४ चे १७.०० वा. ते १७.५५ वा. दरम्यान पठान कॉम्पलेक्स जवळील ग्रिन व्हिला समोरून रोड येथे पोस्टे बोरी येथील स्टाफ बोरी हद्दीत पेट्रोलींग करीत असता गोपनीय माहिती मिळाली एक इसम पठान कॉम्पलेक्स जवळील ग्रिन व्हिला हॉटेलचे बाजूला कोणतातरी हस्तक्षेपनीय गुन्हा करण्याच्या उद्देशाने व लोकांमध्ये भिती निर्माण करण्याच्या उद्देशाने हातात एक लोखंडी धातुचा चाकु सारखा धारदार श़स्त्र घेवुन फिरत आहे. अशा मिळालेल्या माहिती वरून बोरी पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावुन **आरोपी नामे– सोजल निलकंठ चिचघरे, वय २१ वर्ष, रा. मुळक कॉलेजचे मागे तुरकमारी ता हिंगणा जि नागपुर** यास ताब्यात घेतले. आरोपीचे ताब्यातून एक लोखंडी धातुचा चाकु सारखा धारदार श़स्त्र ज्याची लांबी ९.५ इंच, रूंदी १ इंच किंमती २०० रू. चा काळया रंगाचा म्यान मध्ये घेवुन फिरतांना मिळुन आल्याने जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे फिर्यादी नामे– पोशि गौरव मोकडे, पोस्टे बोरी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ४, २५ आर्म ॲक्ट भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला सुचनापत्रावर सोडण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा युनुस खान मो. क्र. ९८५०२७८९०० हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे बोरी येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक हृदयनारायण यादव, पोहवा युनुस खान, पोशि गौरव मोकळे यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर